सकाळ Vidya
SAKAL READER CONNECT INITIATIVE

# आयआयटीयन्सनी सुरु केलेली सांगलीतील एकमेव प्रयास ॲकॅडमी

## कोटा पध्दतीचे मार्गदर्शन

**मुलगा अथवा मुलगी नववी-दहावीमध्ये गेली की पालकांची त्याच्या किंवा तिच्या करिअर संबंधामध्ये घालमेल सुरु होते. कारण आपल्या पाल्याला आता बारावीनंतर कोठे प्रवेश घ्यायचा? कोणता विषय निवडायचा? इंजिनिअरिंगकडे जायचे की मेडिकलकडे? असे अनेक प्रश्न पालकांना भेडसावत असतात. कोण काय सांगते, कोण काय सुचविते... पण प्रत्यक्षात पालकाची अवस्था मात्र दोलायमान होत असते.सांगलीमध्ये आपल्या पाल्याला योग्य ते मार्गदर्शन मिळेल का नाही याबद्दल पालक मंडळी सतत द्विधा मन:स्थितीत असतात.**



पण आता आयआयटीयन मंडळींनी सांगलीमधील या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आपली गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून विद्यार्थ्यांना व पालकांनाही मार्गदर्शक बळ देण्यासाठी 'प्रयास से सफलता तक' हे घोषवाक्य घेऊन प्रा. शिरिष कुंभार या आयआयटी रुरकीतून पदवीधर झालेल्या आणि कोटा पॅटर्नमध्ये काम केलेल्या तरुणाने प्रयास ॲकॅडमी सुरु केली आहे. त्याचे मार्गदर्शक आहेत सांगलीमध्ये ३० वर्षांहून अधिक काळ भौतिकशास्त्र विषयाचे अध्यापन करणारे युनिक ॲकॅडमीचे प्रा. नारायण उंटवाले.

प्रयासमध्ये काय आहे विशेष? तर येथे विद्यार्थ्यांना स्वत:बरोबर स्पर्धा करायला शिकवले जाते. त्यामुळे स्पर्धेच्या जगात उतरण्याआधी विद्यार्थी स्वत:शी स्पर्धा करुन ती जिंकतो व मगच तो जगाच्या स्पर्धेत उतरतो व यशस्वी होतो. प्रयासमध्ये मोफत कल चाचणी घेऊन प्रत्येक विद्यार्थी निहाय आकलन क्षमता समजून घेऊन गरजेनुसार त्या विद्यार्थ्याला करिअर ओरिएंटेड मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी केंद्रित आणि परीक्षाभिमुख शिक्षण, सेल्फ स्टडीसाठी उत्तम प्रतीचे स्टडी मटेरिअल, प्रत्येक वर्गामध्ये मर्यादित विद्यार्थी, सर्व विषयांसाठी शंका निरसन वर्ग अशी प्रयास ॲकॅडमीची एक ना अनेक वैशिष्ट्ये आहेत.

खरे तर सध्या इंजिनिअरिंग किंवा मेडिकलकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे विषय सोप्या भाषेत समजावणे अत्यंत आवश्यक आहे. प्रयास ॲकॅडमीने नेमके हेच केले आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणितातील किचकट संकल्पना सोप्या भाषेत शिकवून त्या लवकरात लवकर कशा सोडवायच्या याच्या क्लृप्त्या शिकवल्या जातात. सुधारित आणि अद्यावत तंत्रज्ञान वापरुन विद्यार्थ्यांना विषयाची काठिण्यपातळी सहजपणे समजाऊन दिली जाते. वस्तुनिष्ठ चाचणी व वर्णनात्मक चाचणी वेळच्या वेळी घेऊन त्यांचे परिणाम विद्यार्थ्यांना लगेच सांगून झालेल्या चुकांबद्दल मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण व विषयाची आवड ओळखून त्यांना मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांचे दैनंदिन व्यवस्थापन ठरवुन दिले जाते. सरावाची नियमितता आणि स्वयंशिस्त ही कोणत्याही मोठ्या यशाची गुरुकिल्ली आहे आणि हीच प्रयास ॲकॅडमीमध्ये दिली जाते.

प्रयास ॲकॅडमीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण अभ्यासक्रम आणि गृहपाठ हा ॲकॅडमीमध्येच करुन घेतला जातो.परीक्षेनंतर करिअर मार्गदर्शन शिबिराचेही आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा चांगलाच लाभ होतो. कोटा पॅटर्नचे मार्गदर्शक, प्रशस्त, हवेशीर क्लासरुम, होस्टेल सुविधा, अभ्यासाला पूरक वातावरण आणि विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होऊ नये यासाठी केले जाणारे खास प्रयत्न करणारी असे या प्रयास ॲकॅडमीचे स्वरुप आहे. सांगलीतून आयआयटी-जेईई, एनईईटी(नीट) साठी मोठमोठ्या शहरांमध्ये जाऊन तेथील मोठा खर्च स्वीकारून आपल्या पाल्यांसाठी धडपडणाऱ्या पालकांसाठी व त्यांच्या भविष्यातील कर्तबगार पाल्यांसाठी प्रयास ॲकॅडमीने सांगलीमध्ये हीच संधी उपलब्ध करुन दिली आहे.

**सांगलीमध्ये ३० वर्षांहून अधिक काळ भौतिकशास्त्र विषय शिकवणारे युनिक ॲकॅडमीचे प्रा. नारायण उंटवाले हे प्रयास ॲकॅडमीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. आयआयटी-रुरकीतून इंजिनिअर झालेले प्रा. शिरिष कुंभार हे संचालक व भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत. आयआयटी-कानपूरमधून पीएच.डी. केलेले डॉ. अख्तर अली हे रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख आहेत.एनआयटीमधून बी. टेक. केलेले प्रा. मुरारी लोवंशी हे गणित विषयाचे प्रमुख आहेत. तर प्रा. अस्मिता काणेकर या जीवशास्त्र विभागाच्या प्रमुख आहेत.**




